# यूजीसीच्या वेळापत्रकाची केंद्राकडे शिफारस

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

करोना संसर्ग रोखण्यासाठी गेल्या दीड महिन्यापासून बंद असलेल्या विद्यापीठ व महाविद्यालयीन शैक्षणिक सत्रामुळे रखडलेल्या परीक्षा एक जुलैपासून सुरू कराव्यात तसेच पुढील सत्र सप्टेंबर ते जुलै असे निश्चित करावे, याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) आखलेल्या वेळापत्रकाची शिफारस केंद्र सरकारला केली आहे. या शिफारशीतील मुद्द्यांबाबत राज्यस्तरावर येत्या आठवड्यात सविस्तर चर्चा होणार आहे. या चर्चेत यूजीसीच्या शिफारशींना हिरवा कंदील मिळाल्यास राज्यातील विद्यापीठांचे शैक्षणिक सत्रही सप्टेंबरपासून सुरू होणार आहे.

२७ मार्चपासून महाविद्यालयीन परीक्षा सुरू होण्यापूर्वीच २४ मार्चपासून देशात लॉकडाउन जाहीर केला. त्यामुळे विद्यापीठाच्या परीक्षा स्थगित केल्या आहेत. लॉकडाउनबाबत अद्याप ठोस निर्णय न झाल्याने परीक्षा, निकाल, पुढील प्रवेश प्रक्रियेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन केंद्र व राज्य स्तरावर यूजीसीच्या माध्यमातून तोडगा



## राज्य समितीच्या निर्णयावर ठरणार विद्यापीठाची भूमिका

काढण्याचे प्रयत्न गेल्या १५ दिवसांपासून सुरू होते. याअंतर्गत बुधवारी यूजीसीने केंद्र सरकारकडे शैक्षणिक सत्राचे नवे वेळापत्रक बनविण्याची शिफारस केली आहे.

याअंतर्गत विद्यापीठाच्या रखडलेल्या परीक्षा १ ते ३१ जुलै या कालावधीत घ्याव्यात व एक सप्टेंबरपासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू करावे, अशी महत्त्वाची शिफारस केली आहे. १६ ते ३० मे या कालावधीत विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याची सूचनाही

### १८ सदस्यीय समिती

विद्यापीठाच्या परीक्षा व शैक्षणिक सत्राचे वेळापत्रक याबाबत यूजीसीने केंद्राकडे केलेल्या शिफारशींच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा नियोजनासंदर्भात अभ्यासपूर्ण अहवाल तयार करण्यासाठी डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखाली १८ सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीची पहिली बैठक २ मे रोजी ऑनलाइन होणार आहे.

वेळापत्रकात केली आहे. यूजीसीच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रक करणाऱ्या हरियाणा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. आर. सी. कुहाड यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने याबाबतचा सविस्तर प्रस्ताव केंद्राला सादर केला आहे. या वेळापत्रकाच्या पार्श्वभूमीवर राज्यस्तरावर नेमलेल्या सहासदस्यीय समितीची येत्या आठवड्यात ऑनलाइन बैठक होणार

> शैक्षणिक सत्रा उशिरा सुरू झाल्यास ते पुढच्यावर्षी लांबणार असले तरी विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही यासाठी यूजीसीच्या समितीने केंद्राकडे शिफारस केली आहे. मात्र, शिफारशीतील मुद्द्यांवर राज्यस्तरावरील निर्णयानुसारच विद्यापीठाची कार्यवाही निश्चित होईल.
>
> डॉ. देवानंद शिंदे,
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

आहे. यावेळी होणारी चर्चा व राज्य समितीद्वारे होणारा निर्णय यावरच परीक्षा व शैक्षणिक सत्र सुरू करण्याची यंत्रणा कार्यान्वित होणार आहे.

पदवीच्या दुसऱ्या वर्षाचे सत्र एक ऑगस्टपासून तर पहिल्या वर्षाचे सत्र एक सप्टेंबरपासून सुरू करावे यासह १ ते २५ जानेवारी या कालावधीत सेमिस्टर परीक्षा व १ ते ३१ जुलैपर्यंत अंतिम परीक्षा अशी रचना यूजीसीच्या नव्या वेळापत्रकानुसार केंद्र व राज्य सरकारने मान्य केल्यास शिवाजी विद्यापीठातही पुढील वर्षी हीच रचना लागू होण्याचे संकेत मिळत आहेत.

**२१३**
विद्यापीठांतर्गत महाविद्यालये

**३**
विद्यापीठ अखत्यारीत येणारे जिल्हे

**२ लाख ५० हजार**
विद्यार्थी संख्या

**४०**
विद्यापीठातील अधिविभाग

**६८०**
एकूण अभ्यासक्रमांचे विषय

**२ महिने**
परीक्षांसाठीचा सरासरी कालावधी

### महत्त्वाच्या शिफारशी

- सर्व महाविद्यालयांनी व्हर्च्युअल क्लासरूम तयार कराव्यात
- आठवड्याच्या वर्कलोडचे योग्य पूर्वनियोजन करावे
- ऑनलाइन अध्यापनाच्या पद्धती कार्यान्वित कराव्यात
- कॉलेज सुरू झाल्यानंतर सुरक्षित वावरचे पालन करावे
- १ ते ३० जून वार्षिक सुट्टी जाहीर करावी
- शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वीच विद्यापीठ व कॉलेजने संसर्ग प्रतिबंध उपाययोजना करावी
- महाविद्यालयांनी आपल्या वेबसाइट अपडेट ठेवाव्यात
- सर्व प्राध्यापकांना तंत्रज्ञानाचे अद्ययावत प्रशिक्षण द्यावे
- प्राध्यापक, विद्यार्थ्यांच्या ट्रॅव्हल्स हिस्ट्रीचा डेटा ठेवावा
- ७५ टक्के अभ्यासक्रम प्रत्यक्ष, तर २५ टक्के अभ्यासक्रम ऑनलाइन शिकवावा

# शैक्षणिक संस्थांची वसतिगृहे ताब्यात घेणार

## सुविधांची चाचपणी; क्वारंटाईनची सोय

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३०: जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांची ७८ वसतिगृहे ताब्यात घेण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधितांना सूचना दिली आहे. तेथे क्वारंनटाईन विभाग सुरू होणार असणार असून, कोरोनाची प्राथमिक लक्षणे दिसणाऱ्यांना येथे क्वारंटाईन केले जाणार आहे.

लॉकडाउन उठल्यानंतर कोरोनाच्या रुग्णांची संख्या वाढण्याचा धोका अधिक आहे. कोरोना पॉझिटिव्ह रुग्णाच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींना क्वारंटाईन केले जाते. जिल्ह्यातील विविध शिक्षण संस्थांची ७८ वसतिगृहे आहेत. त्यातील खोल्यांची संख्या, पाण्याची सुविधा, वीजपुरवठा याची माहिती घेतली गेली आहे. जिल्हा परिषद व समाजकल्याण विभागाच्या वतीने वसतिगृहातील निवासी सुविधांची माहिती मागितली गेली आहे.

सध्या उन्हाळी सुट्यांमुळे शाळा महाविद्यालयांना सुटी आहे. वसतिगृहातील विद्यार्थी त्यांच्या गावी गेले आहेत. जिल्ह्यात परगावाहून येणाऱ्यांना क्वारंनटाईन केले जाते. सध्या शहराच्या विविध भागांत व्यवस्था केली गेली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहांत व्यवस्था केली जाणार आहे. क्वारंटाईन होणऱ्या लोकांची संख्या वाढल्यास त्यांना ठेवायचे कुठे, असा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी तालुकानिहाय वसतिगृह तैनात ठेवली जाणार आहेत.

# शिवाजी विद्यापीठाने नेमली परीक्षा समिती

## १८ जणांचा समावेश, उद्या पहिली ऑनलाईन बैठक; अहवालानंतर वेळापत्रक बनणार



### अशी आहे समिती

या समितीमध्ये प्राचार्य, अधिसभा सदस्य, प्र-कुलगुरू, कुलसचिव, परीक्षा नियंत्रक, व्यवस्थापन परिषद सदस्य, विधी, फार्मसी, अभियांत्रिकी, अन्य व्यावसायिक अभ्यासक्रम यांचे प्रतिनिधी, भाषा, समाजशास्त्र, विज्ञान या विषयांचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे.

**“ युजीसीने ज्या मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. त्या अनुषंगाने विद्यापीठ क्षेत्रातील महाविद्यालयांची माहिती घेण्याचे काम पहिल्या टप्प्यात होईल. त्यानंतर लवकरात लवकर याचा अहवाल कुलगुरूंना देण्यात येईल. त्यानंतर परीक्षांची तारीख, स्वरूप याचा आराखडा बनवून वेळापत्रक बनवले जाईल.**
**– प्राचार्य डॉ. डी. बी. कणसे**

**कोल्हापूर, ता. ३० :** शिवाजी विद्यापीठाने परीक्षा घेण्यासाठी १८ सदस्यांची एक समिती नेमली आहे. ही समिती पूर्ण झालेले अभ्यासक्रम, महाविद्यालयांची परीक्षा घेण्याची क्षमता या सर्वांचा आढावा घेणार आहे. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार परीक्षा घेतल्या जाणार आहेत. सांगलीचे प्राचार्य डॉ. डी. बी. कणसे हे या समितीचे अध्यक्ष असून, पहिली बैठक शनिवारी (ता.२) ऑनलाईन होणार आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यातील सर्व महाविद्यालये २१ मार्चपासून बंद केली होती. विद्यापीठीय सर्व परीक्षा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आल्या. देशातील सर्वच विद्यापीठांनी परीक्षा कक्षा पद्धतीने घ्याव्यात, यासाठी युजीसीने एक समिती नेमली आहे. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी कुलगुरुंची एक समिती नेमली. युजीसीने जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्यात परीक्षा घेण्यासाठी धोरण ठरवण्याचे काम ही समिती करणार आहे. ही समिती महाविद्यालयांचे अभ्यासक्रम कितपत पूर्ण झाले आहेत. सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील कोरोनाचा अधिक प्रादुर्भाव असणाऱ्या क्षेत्रातील महाविद्यालये, तेथील विद्यार्थी संख्या, महाविद्यालयांतर्गत किती परीक्षा झाल्या आहेत. या सर्वच बाबींची माहिती ही समिती संकलित करून याचा एक विस्तृत अहवाल कुलगुरू देवानंद शिंदे यांना देणार आहे.

पुढारी

# यूजीसीच्या शिफारशींबाबत विद्यापीठाची समिती स्थापन

## दोन मे रोजी होणार ऑनलाईन बैठक

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) शिफारशींवर विचार करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने १८ अनुभवी तज्ज्ञ सदस्यांची समिती स्थापन केली आहे. ही समिती यूजीसीच्या शिफारशींचा अभ्यास करणार आहे. २ मे रोजी होणाऱ्या ऑनलाईन बैठकीत याबाबतचा आढावा सादर केला जाणार आहे.

शिवाजी विद्यापीठासह राज्यातील विविध विद्यापीठांच्या परीक्षा कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे रखडल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने रखडलेल्या परीक्षा संदर्भात वेळापत्रक तयार करण्यासाठी एक समिती स्थापन केली. या समितीने परीक्षा, शैक्षणिक वर्षाचे नियोजन, कर्मचाऱ्यांना तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, व्हर्च्युअल क्लासरूम यास विविध शिफारसी सुचवल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने १८ सदस्यांची एक समिती नियुक्त केली आहे. या समितीमध्ये अधिसभा, विद्या परिषद, व्यवस्थापन परिषद या अधिकार मंडळातील अनुभवी ज्येष्ठ सदस्य, विविध अभ्यास मंडळाचे सदस्य, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य यांचा समावेश आहे. ही समिती त्या-त्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा कश ध्यायच्या, येणाऱ्या अडचणी याच अभ्यास करणार आहे. २ मे रोजी य समितीची ऑनलाईन बैठक होणा आहे.

या बैठकीमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारसी व समितीने अभ्यास केलेल्या मुद्द्यांव चर्चा होणार आहे. याचा अहवाल कुलगुरूंना सादर केला जाणा आहे. शासन निर्देश आणि विद्यापीठ समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने विद्यापीठ पुढील कार्यवाही होणा असल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

# जुलैमध्ये ऑनलाइन किंवा ऑफलाइन परीक्षा घ्या

## २ तासांत परीक्षा आटोपण्याच्या यूजीसीच्या सूचना

**नवी दिल्ली :** कोरोना महामारीची आव्हानात्मक परिस्थिती आणि व्यावहारिकता पाहता शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी जुलै महिन्यात ऑनलाइन किंवा ऑफलाइन सेमेस्टर परीक्षा घेण्यास विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) गुरुवारी हिरवा कंदील दाखविला आहे. सोशल डिस्टन्सिंगच्या नियमाचे पालन करीत परीक्षेचा कालावधी तीनवरून दोन तास करण्याची मुभा यूजीसीने दिली आहे.

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

कोरोना महामारीने देशाला विळखा घातल्याने चालू शैक्षणिक वर्षातील परीक्षा खोळंबल्या आहेत. त्यामुळे तांत्रिक स्वरूपात परीक्षा घेण्यास यूजीसीने मंजुरी प्रदान केली आहे. अखेरचे सेमेस्टर येत्या जुलैमध्ये घेण्याचे यूजीसीने सुचविले आहे. विद्यार्थ्यांचे मूल्यांकन अंतर्गत पद्धतीने व्हावे. त्यानुसार, त्यांचे उत्तीर्ण व अनुत्तीर्णतेचे निकष ठरवून त्यानंतर कोरोनाचा प्रकोप कमी असलेल्या राज्यांमध्ये जुलैमध्ये परीक्षा घेण्यास हरकत नाही, असे यूजीसीने आपल्या शिफारस पत्रात नमूद केले आहे. उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे विद्यापीठाने परीक्षा ऑनलाइन अथवा ऑफलाइन घेण्याचा निर्णय घ्यावा. विद्यार्थ्यांना पुरेशी व समान संधी प्रदान करावी. परीक्षेसाठी वैकल्पिक किंवा सरळ उपाययोजना केली जाऊ शकते. प्रसंगी ३ ऐवजी २ तासांची परीक्षा घेण्याचा पर्याय अमलात आणावा. यामुळे परीक्षेची प्रक्रिया कमीत कमी वेळेत पूर्ण होईल, असे यूजीसीचे म्हणणे आहे. दरम्यान, कोरोना संकटात परीक्षा घेत असताना विद्यार्थ्यांची सुरक्षा व त्यांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे यूजीसीने स्पष्ट केले आहे.

## थोडक्यात

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अभिवादन

कोल्हापूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी शिवाजी विद्यापीठाच्यावतीने त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. प्रल्हाद माने उपस्थित होते.

# महाराष्ट्र दिनाचे कार्यक्रम करू नयेत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठामध्ये महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण, अन्य कोणतेही कार्यक्रम होणार नाहीत. संलग्नित महाविद्यालये व आदी विभागांनी उच्च शिक्षण संचालनालयाच्या आदेशानुसार अशा प्रकारचे कोणतेही कार्यक्रम घेऊ नयेत, असे आदेश विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी पत्रकाद्वारे काढले आहेत.

# थोडक्यात


## भूगोल विभागातर्फे ऑनलाइन कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागामार्फत शनिवारी (ता.२) जिओस्पेशियल टेक्नॉलॉजी : ॲप्लिकेशन इन नॅचरल रिसोअर्स ॲपरायझल ॲन्ड मॅनेजमेंट' या एक दिवसीय ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये डिझास्टर रिस्क मॅनेजमेंट, ऑपरेशन डॅशबोर्ड, वॉटर रिसोर्स मॅनेजमेंट आदी विषयांचे विश्लेषण केले जाणार आहे. या कार्यशाळेचे संयोजक विभागप्रमुख प्रा.सचिन पन्हाळकर व समन्वयक सहा. प्रा. प्रशांत पाटील आहेत.

# वृक्षसंपदेचा घेतला ध्यास...

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात देशातील पहिले लीड बॉटॅनिकल गार्डन, पश्चिम घाटातील वनस्पती संशोधनासाठी जगभरातील संशोधकांना खुले करून देणे, दुर्मिळ वनस्पतीचे जतन, संगोपन आणि संवर्धनाचा घेतलेला ध्यास ज्येष्ठ संशोधक डॉ. एस. आर. यादव यांनी घेतला आहे. त्यांनी आजपर्यंत सपुष्प आवृत्तबीजी वनस्पतीच्या ६६ नवीन प्रजाती शोधल्या आहेत. शिवाजी विद्यापीठाचे माजी वनस्पतीविभाग प्रमुख म्हणून कार्यभार सांभाळणारे वनस्पती वर्गीकरण शास्त्रातील कामगिरीचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार मिळविणारे ते राज्यातील एकमेव शास्त्रज्ञ आहेत.

डॉ. यादव यांच्या नावावर नऊ संशोधनात्मक ग्रंथ असून वनस्पती वर्गीकरण आणि वनस्पतींची गुणसूत्र यावर विशेष संशोधन केले आहे. भारतीय उपखंडातील गवतवर्गीय वनस्पतीचे तज्ज्ञ म्हणून त्यांची जगभर ख्याती आहे. पश्चिम घाटातील दुर्मिळ प्रदेशनिष्ठ आणि लुप्त होत चाललेल्या वनस्पतीच्या संवर्धनात त्यांचा मोठा वाटा आहे. सपुष्प आवृत्तबीजी वनस्पतीच्या ६६ नवीन प्रजाती शोधल्या आहेत. जिल्ह्यातील सपुष्प वनस्पती, महाराष्ट्रातील गवते यासह नऊ संशोधनपर ग्रंथ लिहले आहेत.



त्यांच्या संशोधन कार्यांचा गौरव म्हणून विद्यार्थ्यांनी त्यांच्या सन्मानार्थ तीन नवीन वनस्पती प्रजातींना डॉ. श्रीरंग यादव यांची नावे आहेत. यापैकी दोन प्रजाती गवताच्या आणि एक कडधान्याच्या कुळातील आहे. २००७ मध्ये पश्चिम भारतातील पहिली लीड बॉटॅनिकल गार्डन विद्यापीठात उभारली. सुमारे सहा एकर जागेत ही विस्तारली आहे. २००० प्रदेशनिष्ठ प्रजातींचे जतन पश्चिम घाटातील स्थानिक वनस्पतींच्या सुमारे २ हजार प्रदेशनिष्ठ प्रजाती आहेत. यात दुर्मिळ आणि लुप्त होत चाललेल्या वनस्पती आहेत.

लीड बोटॅनिकल गार्डनमध्ये ॲंजिओस्पर्म १०४८, जिम्नोस्पर्म २२ आणि टेरिडोफायटा ६३ अशा एकूण ११३३ प्रजातींच्या वनस्पतींच्या आहेत. डॉ. यादव यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाने ६० प्रकाराच्या नवीन औषधे वनस्पतीचा शोध लावला आहे.

> शिवाजी विद्यापीठात देशातील पहिली लीड बॉटॅनिकल गार्डन उभी झाली, याचे मोठे समाधान आहे. पश्चिम घाटातील वनस्पतीचे दुर्मिळ वनस्पतीचे जतन, संगोपन आणि संवर्धन केले जात असून संशोधनाचा टक्का वाढला आहे.
>
> – डॉ. एस. आर. यादव, ज्येष्ठ संशोधक

# विद्यापीठ परीक्षांच्या नियोजनासाठी समिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शाळा महाविद्यालय, विद्यापीठांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने १८ सदस्यांची एक समिती नेमली आहे. ही समिती कोल्हापूर, सांगली, सातारा येथील महाविद्यालयांची परीक्षा घेण्याची क्षमता, पूर्ण झालेले अभ्यासक्रम या सर्वांचा आढावा घेणार आहे. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार परीक्षा घेण्यात येणार आहेत. सांगलीचे प्राचार्य डॉ. डी. बी.कणसे हे या समितीचे अध्यक्ष आहेत. समितीची पहिली बैठक शनिवारी (२ एप्रिल) रोजी ऑनलाईन पद्धतीने होणार आहे.

३ मेपर्यंत लॉकडाऊन आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व महाविद्यालये २१ मार्चपासून बंद करण्यात आली आहेत. यामुळे विद्यापीठाच्या सर्वच परीक्षा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आल्या आहेत. देशातील सर्वच विद्यापीठांनी



परीक्षा कोणत्या पद्धतीने घ्याव्यात यासाठी युजीसीने एक समिती नेमली आहे. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी कुलगुरूंची एक समिती नेमली. युजीसीने जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्यात परीक्षा घेण्यासाठी धोरण ठरवण्याचे काम ही समिती करत आहे. ही समिती महाविद्यालयांचे अभ्यासक्रम कितपत पूर्ण झाले आहेत. सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील कोरोनाचा अधिक प्रार्दुभाव असणाऱ्या क्षेत्रातील महाविद्यालये तेथील विद्यार्थी संख्या, महाविद्यालयांतर्गत किती परीक्षा झाल्या आहेत, या सर्वच बाबींची माहिती ही समिती संकलित करून याचा विस्तृत अहवाल कुलगुरू देवानंद शिंदे यांना देणार आहे.